# सभेचे इतिवृत्त

## वर्धा जिल्हा निर्यात प्रचालन कार्यबल समिती दिनांक 25.11.2020 सभेचे इतिवृत्त.

जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समितीची जिल्हास्तरीय कार्यबल समितीची (DLTFC) सभा दिनांक 25.11.2020 रोजी दुपारी 2.30 वाजता मा. महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,वर्धा यांच्या अध्यक्षते खाली पार पडलेल्या सभेचे इतिवृत्त.

सदर सभेमध्ये खालील प्रमाणे सदस्य हजर होते.

1. श्री. सचिन राऊत, वरिष्ठ वैज्ञानिक,( MGIRI ) ,वर्धा.
2. श्री. सुनिल जगदीश, अग्रणी व्यवस्थापक, बॅक ऑफ इडिया, वर्धा प्रतिनिधी
3. श्री.शशीभूषन वैद्य, लघु उद्योग भारती, संघटना,वर्धा.
4. श्री.प्रविण हिवरे, एमआयडीसी औद्योगिक संघटना,वर्धा.
5. श्री.धनजय लोडे,कर सहाय्यक, जिल्हा वस्तू व सेवाकर अधिकारी,वर्धा.
6. कु.अश्विनी कोकाटे,व्यवस्थापक तथा सदस्य सचिव(Export Promotion DLTFC)जि.उ.कें.वर्धा.

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन कार्यबल समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांचे अनुमतीने खालील बाबी अवगत केल्या.

केंद्र शासनाच्या वाणिज्य व उघोग मंत्रालयाच्या विदेश व्यापार महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी दि.26/12/2019 च्या पत्रान्वये जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समितीची (Export Promotion Council ) गठीत करण्यासंबंधी सुचना केली आहे. जिल्यातील निर्यात वाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये,औघोगीक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इत्यादी यांच्याशी सातत्याने पाठपुरावा,समन्वय व अडचणी दुर करण्याच्या दुष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी प्रत्येक जिल्हयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेची समिती गठीत करण्यात आली. तसेच या समितीस निर्यात वृध्दी बाबत आढावा व मार्गदर्शन सुचनेबाबत अहवाल सादर करण्यासाठी मा.महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कार्यबल समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर समितीमध्ये खालील प्रमाणे सदस्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.संयुक्त महानिदेशक किवा प्रतिनिधी विदेश व्यापार कार्यालय, नागपूर | सदस्य |
| 2. | जिल्हा वस्तू व सेवाकर अधिकारी,वर्धा | सदस्य |
| 3. | जिल्हा अग्रणी बॅक व्यवस्थापक,वर्धा | सदस्य |
| 4. | श्री.प्रविण हिवरे, एमआयडीसी औद्योगिक संघटना,वर्धा | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | | सदस्य |
| 5. | श्री.शशीभूषण वैद्य, लघु उद्योग भारती संघटना,वर्धा. | सदस्य |
| 6. | श्री.प्रविण मुळे,नाबार्ड चे अधिकारी | |
| | | सदस्य |
| 7. | संचालक,सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रम यांचे प्रतिनिधी | |
| 8. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,नागपूर. | सदस्य |
| 9. | निदेशक,महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकरण संस्थान (MGIRI),वर्धा (सल्लागार) | सदस्य |
| 10. | प्रकल्प संचालक,आत्मा,वर्धा | सदस्य |
| 11. | मे.पी.व्ही.टेक्सटाईल्स लि.हिंगणघाट. | सदस्य |
| 12. | मे.संस्कार ॲग्रो लि. वायगाव (निपानी),वर्धा | सदस्य |

**समितीची कार्ये :-**

1.वाणिज्य व उघोग मंत्रालय, भारत सरकार व राज्य शासन यांच्यामध्ये समन्वय साधुन जिल्यांना निर्यात केंद्र बनविण्यासाठी प्रयत्न करणे.

2. जिल्यांना निर्यात केंद्र म्हणुन विकसित करुण निर्यात वृध्दीसाठी प्रयत्न करणे.

3. निर्यातीसाठी नविन क्षेत्राची निवड करणे.

4.जिल्हयातील पायाभुत सुविधा विकसीत करण्यासाठीचे अडथळे ओळखुन निर्यातीसाठी पुरक धोरण राबविणे.

**या सभेमध्ये वरिल सदस्याच्या उपस्थिमध्ये खालील विषयावर चर्चा झाली.**

1. वर्धा जिल्हा हा कापूस व शेती उत्पादनामध्ये अनुकूल असल्यामुळे अन्न प्रक्रिया व खादी तसेच Textile यांची ODOP (One District One Product) म्हणुन निवड करण्याचे लघु उद्योग भारती संघटना,वर्धा चे अध्यक्ष, MGIRI चे प्रतिनीधी यांनी सुचविले.

2. सदस्यांसोबत चर्चा केल्याप्रमाणे District Export Action Plan तयार करण्यात येत आहे.

3. अध्यक्ष, लघु उद्योग भारती, वर्धा यांनी सुचवल्याप्रमाणे निर्यात बद्दल माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहचविण्यासाठी Press note तसेच DGFT च्या सहाय्याने Outreach Programmes आयोजीत करण्याबददल निर्णय घेण्यात आला.

4. (Potential) संभाव्य निर्यात प्रचालन उद्योजकांची यादी व सद्यस्थितीत निर्यात करत असलेल्या उद्योजकांची यादी तयार केल्यास पुढील निर्यात प्रोत्साहनाच्या योजना व माहिती देऊन निर्यात वृध्दी होईल.त्या अनुषंगाने व्यवस्थापक, जिउके, वर्धा यांनी DGFT व औ्द्योगिक संघटनांच्या मदतीने सदर माहिती तयार करावे असे ठरविण्यात आले.

5. वर्धा जिल्हयातील वायगाव येथील हळदीसाठी GI(Geographical Indicator tag) प्राप्त झाले असून हळदी प्रक्रिया करीत असलेल्या उद्योजकांना प्रक्रिया झाल्यानंतर टेस्टींग लॅब व इतर सुविधांची गरज भासल्यास M-GIRI येथे सदर व्यवस्था करता येईल का त्या अनुषंगाने प्रयत्न करण्याचे ठरविले आहे.
6. वर्धा जिल्हयातील कापूस हे प्रमुख उत्पादन असून कापसावरील प्रक्रिया करुन खादीचे कापड तयार करणारे घटक व ग्रे क्लॉथ (Textile) उद्योग यांना प्रवृत्त करुन जास्तीत जास्त निर्यात वाढ करता येईल याबदल प्रयत्न करणे.

वरील बाबीवर चर्चा करण्यात आली त्यानंतर सदस्य सचिव यांनी सर्व सदस्याचे आभार मानून सभा संपली असे जाहीर केले.

व्यवस्थापक,तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग केंद्र,वर्धा.